# गायत्री महिला बचत गट, मौदा

मी शोभा पुरूषोत्तम शेंडे मौदा हया गावात राहते. घरची परिस्थीती फार गरिबीची आहे. माहेरचा पण आधार नाही. पतिचा छोटासा कोंबडयाचा धंदा होता. त्यांना महिण्यातुन 800 ते 900 रूपये महिना मिळायचा त्यात कसा बसा संसार चालत होता. तरी पण मी सुखी होते. अशातच ईश्वराची कृपा झाली. एके दिवशी काही महिला एकत्र येवुन बचत गटाविषयी चर्चा करित होत्या. मी त्यांना विचारपुस केली असता त्यांनी गटाविषयी



संपुर्ण माहिती दिली. मी त्यांच्या गटात समाविष्ट झाले आमच्या गटाचे नाव गायत्री महिला बचत गट हे आहे. तेव्हा गटामार्फत भारतिय स्टेट बॅक आफ इंडिया बॅकेने 30,000 रू कर्ज मंजुर केले. त्या कर्जाची आम्ही नियमित परतफेड केली. त्यानंतर नागेश्वरा चॅरिटेबल ट्रस्टने भारतिय स्टेट बॅक आफ इंडिया मार्फत मायक्रो फॉयनान्सचे कर्ज वाटप सुरू केले आहे. म्हणुन आम्ही फार्म भरले. या पैशातुन मी कोंबडया खरेदी केल्या त्यामुळे मला जास्त भांडवल मिळू लागले. त्यामुळे महिण्याचा घरचा खर्च व घेतलेल्या कर्जाची परतफेड करू लागले. त्यानंतर पुन्हा दुसऱ्यांदा महिला बचत गटातुन 12,ते 13 महिला मिळुन 80,000 रू कर्ज घेतले. त्या कर्जाद्वारे मिळालेल्या पैश्यात कोंबडयाचा धंदा मोठया प्रमाणात सुरू केला. आता मी फार आनंदी आहे. बचत गटामुळे माझा आर्थिक विकास घडुन आला त्यामुळे मी बचत गट व नागेश्वरा चॅरिटेबल ट्रस्ट यांचे फार आभारी आहे. कारण आमच्या सारख्या गरिब महिलांना मदत करून आमचे जिवनमान उंचावण्यात मदत केली. आमच्या परिस्थिती मध्ये सुधारणा घडून आली. मी श्री. मुर्ति साहेब व त्यांचे सहकारी यांचे उपकार कधीच विसरू शकत नाही.